# शिक्षण प्रक्रियेत शिक्षण प्रतिमानांचे महत्त्व

**श्री. संजय संतराम जावळे**

**प्रास्ताविक :**

प्रतिमानाचा अर्थ एखाद्या विशिष्ठ आदर्शाच्या अनुरूप तयार करण्यासाठीची प्रक्रिया. शिक्षणाच्या उद्‍देश्यांना प्राप्त करण्यासाठी वेळ आणि आवश्यकता नुसार ज्या आदर्शांना समोर ठेवून शिक्षणाच्या उद्‍देश्यांचे प्रतिपादन केल्या जाते. त्यांनाच शिक्षणाचे प्रतिमान असे म्हणतात.

**शिक्षण प्रतिमानाचा अर्थ/शिक्षण प्रतिमानाची विशेषता/शिक्षण प्रतिमान संकल्पना :**

शिक्षण प्रतिमान शिक्षण सिध्दांताच्या विकासामध्ये परिकल्पनेचे कार्य करत असतात.

**क्रोन बेक :–** यांच्या म्हणण्यानुसार शिक्षणाच्या प्रक्रियेसाठी अधिगम सिध्दांताची आवश्यकता असते. कारण की, अधिगम सिद्धांतांच्या आधारावरच शिक्षण सिद्धांतांना प्रतिपादित केल्या जाते. शिक्षणाच्या कोणत्याही सिद्धांताचे स्वतंत्ररित्या आजपर्यंत प्रतिपादन होऊ शकले नाही. केवळ शिक्षणच्या मोजक्याच प्रतिमानांना प्रतिपादित केले गेले आहे. **शिक्षणाचे प्रतिमान म्हणजे काय?** शिक्षण प्रतिमान इंग्रजीच्या 'Teaching Model' चे मराठी रूपांतरण आहे. प्रतिमानचा अर्थ 'एखद्या आदर्शानुरूप व्यवहार करण्याची प्रक्रिया शिक्षणच्या उद्‍देश्यांना प्राप्त करण्यासाठी वेळ आणि आवश्यकतानुसार ज्या आदर्शांना समोर ठेवून शिक्षण उद्‍देश्यांचे प्रतिपादन केले जाते. त्यांनाच शिक्षणाचे प्रतिमान म्हटले जाते.

'एच. सी. विल्ड' यांनी प्रतिमानाच्या बाबतीत म्हटले आहे कि, ''प्रतिमान एखाद्या आदर्शानुरूप व्यवहार करण्याची प्रक्रिया आहे.'' यावरून हे स्पष्ट होते कि, प्रतिमान एखाद्या विशिष्ट उद्‍देश्यांच्या अनुकुल व्यवहारात परिवर्तन आणण्याची प्रक्रिया आहे. प्रतिमान अशी स्वयं सिद्ध कल्पना होऊ शकते जिचा उपयोग व प्रयोग शिक्षक आपल्या शिक्षणास प्रभावशाली करण्यासाठी आाणि शिक्षण उद्‍देश्यांच्या प्राप्तिसाठी करतात.

**काही महत्वपुर्ण व्याख्या :–**

**बी. आर. जॉयसी :–** ''शिक्षण प्रतिमान अनुदेशी अभिकल्पाचे साधन आहेत. हे विद्यार्थ्यांच्या अन्त:क्रियेव्दारा त्यांच्या व्यवहारात विशिष्ठ परिवर्तन आणण्यासाठी विशेष परिस्थितिची दशा आणि उल्लेख तथा प्रस्तुतीकरण करतात.''

**भटनागर यांच्या नुसार :–** ''शिक्षण प्रतिमानास अधिगम उद्‍देश्य, वातावरण संबंधी दक्षता आणि अन्य प्रक्रियांचे सम्मिलित रूप म्हटल्या जाते.''

**डिसिको यांच्या नुसार :–** ''शिक्षण प्रतिमान केवळ अनुदेशन प्रारूप आहे.'' शिक्षण प्रतिमानाचा संकेत शिक्षण तथा अधिगमची परिस्थिती एकमेकांशी कशा पद्धतीने संबंधित आहे.

यावरून पाठ्यक्रमाची रचना, शिक्षण सामग्रीची निवड करणे आणि शैक्षिक उद्‌देश्यांची प्राप्ती करण्यासाठी शिक्षकांचे मार्गदर्शन इत्यादी करण्यासाठी शिक्षण प्रतिमानांस अनुभव आाणि प्रयांगांचे निष्कर्ष सुद्धा म्हटल्या जाते.

**शिक्षण प्रतिमानाचे मुख्य तत्व :–**

१. **उद्‌देश (Aims)** :– कोणत्याही प्रतिमानाचे कोणतेतरी लक्ष्य असते. हीच गोष्ट महत्वपूर्ण असल्यामुळे प्रतिमानास विकसित केल्या जाते. उद्‌देशांमुळेच शिक्षण प्रतिमानास दिशा प्रदान केली जाते.

२. **संरचना (Syntax)** :– या मध्ये शिक्षक व विद्यार्थी यांची अन्त:क्रिया होऊन वांच्छित परिस्थिती निर्माण होऊन शिक्षणचे उद्‌देश्य सफलतापूर्वक प्राप्त केल्या जातात.

३. **समाजिक प्रणाली (social system)** :– सामाजिक प्रणालीमध्ये विद्यार्थी व शिक्षक यांना केंद्रभूत मानले जाते. अभिक्रमित प्रविधीचाही समावेश केला जातो. यामध्ये अभिप्रेरणा सोबतच प्रत्येक प्रतिमानात हे मानतात कि, समाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी एखादी यंत्रणा असावी.

४. **मुल्यांकन प्रणाली (Support system)** :– या मध्ये शिक्षणाचे उद्‌देश्य व विद्यार्थ्यांत कितपत वर्तनबदल झाला. यावरून शिक्षणाची सफलता अथवा असफलता यांचे मूल्यांकन केल्या जाते.

**शिक्षण प्रतिमानांची विशेषता तथा महत्व :–**

१. शिक्षणाच्या प्रतिमानाचे निश्‍चित आधार असतात हे आधारभूत तत्व म्हणजेच शिक्षणाचे वातावरण, शिक्षक व विद्यार्थी यांच्यामधील अन्त:क्रिया व शिक्षण सरळ, स्पष्ट तथा बोधगम्य करण्यासाठी निती तथा युक्तींचा प्रयोग.

२. शिक्षण प्रतिमान शिक्षक व विद्यार्थी दोघांनाही उपयुक्त अनुभव प्रदान करतात.

३. शिक्षण प्रतिमानामुळे सर्व मौलिक प्रश्‍न जसे कि शिक्षकाचा व्यवहार आणि त्याचा विद्यार्थ्यांवर प्रभाव इत्यादी मौ. लिक प्रश्नांची उत्तरे देतात/मिळतात.

४. शिक्षण प्रतिमान व्यक्तिभिन्नतेच्या सिद्धांतावर आधारित आहे.

५. शिक्षण प्रतिमानाचे प्रतिपादन विद्यार्थ्यांची रूचि लक्षात घेऊन केले जाते.

६. हरबर्ट यांची पंचपदी आजही शिक्षणात महत्वपूर्ण मानली जाते. यांमध्ये विद्यार्थ्यांच्या अभिरूचींचा उपयोग केल्या जातो.

७. प्रत्येक प्रतिमानावर कोणत्यातरी विचारसरणीचा प्रभाव असतो. शिक्षकांवर ज्या विचारसरणीचा प्रभाव असतो. त्या प्रमाण शिक्षक प्रतिमानांचे प्रतिपादन करतात.

८. शिक्षण प्रतिमानाचा विकास अभ्यास आणि साधनेव्दारा शक्य आहे.

९. शिक्षण सुत्र शिक्षण प्रतिमानाच्या निर्मितीमध्ये आधाराचे काम करतात.

१०. शिक्षण प्रतिमान मानवता विकासामध्ये मदत करतात आणि त्यासोबतच शिक्षकांच्या सामाजिक क्षमतेमध्ये वृद्धि करतात.

११. शिक्षण प्रतिमानामुळे शिक्षकांच्या व्यक्तित्वांत गुणात्मक प्रगती साधते.

१२.प्रत्येक शिक्षण प्रतिमानात त्याची मूल्यांकन प्रणाली निहित असते.

१३.शिक्षण प्रतिमानाची निर्मिती अधिगम सिद्धांतांच्या आधारावर केल्या जाते.

१४.शिक्षण प्रतिमानाची एक सामाजिक प्रणाली असते.

१५.शिक्षण प्रतिमानातून सामाजिक आवश्यकतांची पूर्ती करण्यावर लक्ष दिल्या जाते आणि त्या अनुरूप विद्यार्थ्यांच्या योग्यतेवर व विकासावर भर दिल्या जातो.

१६.शिक्षण प्रतिमानांमध्ये निश्चित सुत्रांचा उपयोग केल्या जातो.

**समारोप :–**

शिक्षण प्रविधि, शिक्षण सिद्धांत, शिक्षण कौशल्य, सुक्ष्म शिक्षण, शिक्षण स्तर, शिक्षण सुत्र, व्यूहरचना, शिक्षण तंत्रज्ञान इ. सर्वच बाबींची सांगड घातल्यास शिक्षण प्रतिमान शिक्षण सिद्धांत व त्यांचे वैज्ञानिक आधार अभ्यासण्यासाठी नक्कीच मदत होईल.

कारण आजचे शिक्षण हे बालकेंद्रित आहे. त्यासाठी शिक्षण प्रतिमानांची शिक्षण सिद्धांतांची व वैज्ञानिक आधारांची गरज असते. ज्या प्रमाणे एक अभियंता एखाद्या इमारतीस नियोजनानुसार तयार करतो. त्याप्रमाणे एक शिक्षक आपले अध्यापन प्रभावपूर्ण करण्यासाठी शिक्षण प्रतिमानांचा उपयोग करतो. प्रतिमानामुळे व्यक्तिस अवलोकन करून यशस्वीरित्या व यतार्थरित्या समजण्यास मदत मिळते.

**संदर्भ ग्रंथ :–**


1. Dr. sonwane J. R.(2013) शिक्षण प्रतिमान www.edupublication.com

२. फडके वासंती, (१९८८) अध्यापनाची प्रतिमाने, नुतन प्रकाशन पूणे

३. महाले सं. रा. (२००५) अध्यापन प्रतिमाने आणि अध्ययन शैली, युनिक पब्लिकेशन, औरंगाबाद

४. देशपांडे, व सौ. आाणि डॉ. महाले, सं. रा. (२००८), अध्यापन आणि अध्यापक शिक्षण संशोधनच्या दिशा, प्रशिक्षण प्रकाशन. नाशिक